# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

( पूर्वीचे पुणे विद्यापीठ )

## परिपत्रक क्र.१५७/२०२२

सर्व शिक्षक व शिक्षकेतर अधिकारी/सेवकांना या परिपत्रकाव्दारे कळविण्यात येते की, विद्यापीठातील 'खाशाबा जाधव क्रीडा संकुल' येथील **पॅव्हेलियन इमारत, अद्ययावत सिंथेटिक ट्रॅक आणि इनडोअर हॉलचे उद्घाटन** समारंभ रविवार, दिनांक ०५ जून, २०२२ रोजी दुपारी २.०० ते ३.३० या वेळेत **(रविवार सुट्टीच्या दिवशी)** आयोजित करण्यात आलेला आहे.

सदर समारंभानिमित्त विद्यापीठ कार्यालय शनिवार, दिनांक ०४ जून, २०२२ रोजी **(पहिला शनिवार सुट्टीच्या दिवशी)** तसेच रविवार, दिनांक ०५ जून, २०२२ रोजी **(रविवार सुट्टीच्या दिवशी)** नेहमीच्या कार्यालयीन वेळेप्रमाणे सुरु राहील याची सर्वांनी नोंद घेवून कार्यालयात उपस्थित रहावे. सर्व शिक्षक व शिक्षकेतर अधिकारी/सेवकांनी आपले विभागातील बायोमॅट्रिक उपस्थिती प्रणालीव्दारे आपली उपस्थिती नोंदवून विभागातील हजेरीपत्रकामध्ये स्वाक्षरी करावी.

सदर समारंभाचे सविस्तर परिपत्रक सर्वसाधारण विभागाकडून स्वतंत्रपणे काढण्यात येत आहे. उपरोक्त दिवसांची पर्यायी सुट्टी यथावकाश जाहीर करण्यात येईल, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

सर्व शिक्षक व शिक्षकेतर अधिकारी/सेवकांनी सदर कार्यक्रमास उपस्थित राहणे बंधनकारक आहे.

यापूर्वी प्रसिध्द केलेले परिपत्रक क्र.१५५/२०२२, जा.क्र.२४६५, दिनांक ०२ जून, २०२२ रद्द समजण्यात यावे.

**(डॉ.प्रफुल्ल पवार)**
**कुलसचिव**

गणेशखिंड, पुणे - ४११ ००७
जा.क्र. : एएन/२४६७
दिनांक : ०३/०६/२०२२

**प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी :-**

१. सर्व विभागप्रमुख, शैक्षणिक विभाग
२. सर्व शाखाप्रमुख, प्रशासकीय विभाग

सदर परिपत्रकातील आशय आपल्या विभागातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर अधिकारी/सेवकांच्या निदर्शनास आणून द्यावा, ही विनंती.